# <u>उस्मानाबाद पोलीस शिपाई चालक भरती 2019-</u>

जाहिरात क्रमांक

दिनांक 30/11/2019

पोलीस अधीक्षक कार्यालय,उस्मानाबाद यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक यांची (33) रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीव्दारे दिनांक 02.12.2019 ते 22.12.2019 या कालावधीत भरण्यात येणार आहेत. या बद्दलची सविस्तर माहिती www.mahapariksha.gov.in,www.mahapolice.gov.inआणिwww.osmanabadpolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरिक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, 2019 मधील तरतुदी पोलीस शिपाई चालक पदासाठी लागू आहेत.
- पोलीस शिपाई चालक पदासाठी उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावा लागेल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा www.mahapariksha.gov.in या पोर्टलवर उपलब्ध राहणार आहे. पोलीस शिपाई चालक पदासाठी एकाच पोलीस घटकात एकापेक्षा जास्त अर्ज करण्यास मुभा नाही. जर एका उमेदवाराने एकाच पोलीस घटकातील पोलीस शिपाई चालक पदासाठी एकापेक्षा अधिक अर्ज केलेले आहेत, असे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रदद केली जाईल.
- पोलीस शिपाई चालक पदाच्या आवेदन अर्जासाठी उमेदवाराची लेखी परीक्षा महापरीक्षा पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने आधी घेण्यात येणार आहे. शारीरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे मोजमाप व शारीरीक चाचणी उमेदवाराने ज्या पोलीस घटकासाठी अर्ज केला आहे, त्या पोलीस घटकामार्फत घेण्यात येईल. दोन घटकांतील शारीरीक चाचणीच्या तारखा एकाच दिवशी आल्यास त्याची जबाबदारी ह्या कार्यालयाची राहणार नाही व त्यामध्ये बदल करता येणार नाही.
- उमेदवारांनी आवेदन अर्जात अचूक माहिती द्यावी. चुकीची माहिती दिल्यास , उमेदवारी कोणत्याही टप्यावर रद्द होईल. उमेदवारांची लेखी परीक्षा व शारीरीक चाचणीनंतर ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांचीच सर्व मुळ कागदपत्रे तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल. केवळ लेखी परीक्षा व शारीरीक चाचणीद्वारे निवड झाली म्हणून तो पात्र ठरणार नाही.
- **सेवाप्रवेश नियमांमधील तरतुदीनुसार भरती प्रक्रियेमध्ये प्रथम लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यानंतर गुणवत्तेनुसार शारिरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी घेण्यात येईल. सदरहू वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी ही अर्हता चाचणी असेल. त्यानंतर उमेदवारांची शारिरीक चाचणी घेण्यात येईल.** ऑनलाईन घेण्यात आलेली लेखी परीक्षा व शारिरीक चाचणीत उमेदवारांना प्राप्त झालेल्या एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसूची तयार करण्यात येईल. तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसुची तयार करण्यात येईल. तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.
- जाहिरातीतील नमूद केलेल्या रिक्त पदांची एकूण संख्या/ पूर्ण पदे भरण्याबाबत शासन आदेशाच्या अधीन असेल. पद संख्या कमी झाल्यास उमेदवारास निवडीबाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.
- पोलीस शिपाई चालक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे/ कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सूचना www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. जाहिरात काळजीपुर्वक वाचून, समजून घेऊन व रिक्त पदांबाबतची खातरजमा करुन उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.

(राज तिलक रौशन)
पोलीस अधीक्षक,उस्मानाबाद

**संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात**

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई चालक भरती सन 2019
## पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

महाराष्ट्र साहयक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हावलदार चालक,पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम 2019 मधील तरतुदीनुसार पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांचे आस्थापनेवर सन 2019 मध्ये पोलीस शिपाई चालक संवर्गात रिक्त होणारी (33) पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई चालक पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

| तपशील | अ.जाती | अ.जमाती | वि.जा.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज-ड | वि.मा.प्र | इ.मा.व. | एसईबीसी | इडब्ल्युएस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **सर्वसाधारण** | 02 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 03 | 02 | 02 | 05 | 20 |
| **महिला** | 01 | 01 | -- | -- | -- | -- | -- | 02 | 01 | 01 | 03 | 09 |
| **खेळाडू** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **प्रकल्पग्रस्त** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **भुकंपग्रस्त** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **माजी सैनिक** | 01 | -- | -- | -- | -- | -- | -- | 01 | 01 | -- | 01 | 04 |
| **अंशकालीन पदवीधर** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **पोलीस पाल्य** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **गृहरक्षक दल** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **अनाथ** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **एकूण** | **04** | **02** | 01 | 01 | **01** | **01** | **01** | **06** | **04** | **03** | 09 | 33 |

अ) उपरोक्त पदे ही दिनांक 31/12/2019 अखेरपर्यंत रिक्त होणा-या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावली नुसार निश्चिती करण्यात आलेली आहेत.

ब) अंतिम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणा-या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional Selection) असेल. निवड यादी मध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणुन नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असु समजण्यात येवु नये.

क) पदोन्नतीवरील आरक्षणासंदार्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक 28306/2017 बाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक 175/2018 व इतर संलग्न याचिका मध्ये दि.27/6/2019 रोजी दिलेल्या निर्णया विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिके बाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून रिक्त पदाची गणणा

केलेली आहे. त्यामुळे जाहिराती मध्ये नमूद केलेल्या रिक्त पदाच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे दर्शविलेली पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे. त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

ड) शासनाने लागू केलेले खुल्या प्रवर्गातील आर्थीक दूर्बल घटकांसाठी लागू केलेले आरक्षण हे या अनुषंगाने उद्‌भवणा-या न्यायलयीन प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन असेल.

2. महाराष्ट्र सहाय्यक पोलीस उप निरीक्षक चालक,पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम,2019 www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर (Home Page) वर व (www.osmanabadpolice.gov.in ) वर उपलब्ध असून ते पोलीस शिपाई चालक पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागू राहतील.

**महत्वाची टीप** :-

i. पोलीस शिपाई चालक भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबधीत उमेदवारांने त्याबाबतची माहिती ॲन्टीकरप्शन ब्युरो उस्मानाबाद यांना दुरध्वनी क्रमांक **02772-222879 (हेल्प लाईन क्रं.**1064) वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांचेशी किंवा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय) उस्मानाबाद यांचे कार्यालयात 02472-227624 या दुरध्वनीवर संपर्क साधून तक्रार करु शकतील. तसेच अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयात 022-22855614 या दुरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

ii. उमेदवारांना कांही अडचण भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईनवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र | संस्था/ कार्यालयाचे नांव | दुरध्वनी/ मोबाईल क्रमांक (नियंत्रण कक्ष) |
| --- | --- | --- |
| 1. | पोलीस अधीक्षक कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | 02472-222700<br>02472-222717 |

**(राज तिलक रौशन )**

**पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.**